# समकालीन अस्तित्ववादी कवी

**डॉ. सुधीर भगत**
सहयोगी प्राध्यापक,
भगवंतराव कला व विज्ञान महाविद्यालय
एटापल्ली जि.गडचिरोली ४४२७०४
7588103438
drsudhirbhagat@gmail.com

---

## प्रस्तावना

आधुनिक तत्त्वज्ञानातील एक प्रभावी विचारसरणी म्हणून अस्तित्ववादाला ओळखले जाते. ते एक पाश्चात्त्य तत्त्वज्ञान आहे. अस्तित्ववाद हे मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान असून अस्तिव म्हणजे असणे. हा शब्द मानवी अस्तित्वाबाबत वापरला जातो. या विचाराचा परिचय सर्वप्रथम १९ व्या शतकामध्ये सोरेन किर्केगार्द या तत्त्ववेत्याच्या लेखनात दिसुन येतो. अस्तित्ववाद हा शब्द त्यांनीच प्रथम वापरला. परात्मता, असंबद्धता, असंगतता, भयाकुलता इत्यादी अस्तित्ववादाचे आशयसुत्रे आहेत. मानवाला स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव असते. ती इतर प्राणी वस्तूंना नसते. त्यामुळे तो सर्वापेक्षा वेगळा ठरतो. म्हणून मानवी जीवनाची वास्तवता या तत्त्वज्ञानात सांगितली जाते. जे आहे ते वास्तव जीवन जगणे, ते ही आपल्या शैलीने हे अस्तित्ववाद शिकविते. मानवी अस्तिव, त्याची परिस्थिती, स्वरूप एकूण मानवी जीवनविषयीचा विचार या तत्त्वज्ञानात केला जातो.

## अस्तित्ववादाची पार्श्वभूमी

१९ व्या शतकात पाश्चात्त्य जगात अस्तित्ववादी तत्त्वज्ञान जन्माला आले. तत्कालीन सामाजिक, राजकीय, धार्मिक परिस्थिती या साहित्याच्या जन्माला कारण ठरली. पहिले व दुसरे जागतिक महायुद्धे झाली.यामध्ये प्रचंड प्राणहानी, वित्तहानी झाली. या युद्धात प्रथमच अणुबॉम्बचा वापर करण्यात आला. विज्ञान हे प्रचंड विनाश करू शकतो, ही भावना लोकांची झाली. ईश्वरावरचा विश्वास उडाला. यातून माणूस हा माणसाचा नाश करण्याकरिता काहीही करू शकतो, असे प्रत्येकालाच वाटू लागले. ही पार्श्वभूमी या अस्तित्ववादी विचाराला पोषक ठरली. एकूणच या महायुद्धाने मानवी जीवनाचे समीकरणे बदलली. लोकांचा भ्रमनिरास झाला. त्यामुळे अस्तित्ववादाचे आकर्षण विशेषत: तरूण वर्गाला वाटू लागले. याबाबत रेखा इमानदार साने म्हणतात, ''माणसाच्या परिवर्तनक्षमतेवर, निरंतर घडत जाण्यावर दिलेला भर, बुद्धीपेक्षा भावनांचे मानलेले वर्चस्व व स्वैर चिंतनाची अनुसरलेली पद्धत यामुळे अस्तित्ववादाचे साहित्याशी संबंध प्रस्थापित केला. 'इथे आणि आत्ता' चा क्षण अन् क्षण उत्कटतेने जगण्याचा ध्यास तसेच अस्तित्व कसास लागेल अशा कसोटीच्या प्रसंगाना सामोरे जाणे आणि त्यातून आत्मस्वातंत्र्याची प्रचीती येणे यामुळे ही अस्तित्ववाद्यांना साहित्यरूपाची ओढ वाटते.'' अशी या विचाराची उपयुक्तता होती. अस्तित्ववाद हे एक अत्यंत गंभीर आणि जबाबदार विचार असल्याचे समोर येऊ लागले.

आधुनिक तत्त्वज्ञानातील एक प्रमुख व प्रभावी विचारसरणी म्हणून आज अस्तित्ववादाला ओळखले जाते. या विचाराचा सर्वप्रथम परिचय १९ व्या शतकाच्या सुरूवातीपासुन सोरेन किर्केगार्द या तत्त्ववेत्त्याच्या लेखनात दिसून येतो. या विचारवंताशिवाय फ्रेडरिक नित्शे, कॉर्ल यास्पर्स, ग्रेनियल मार्सेल, मार्टिन हायडेगर,

कामू व सात्रे यांच्या लिखाणातून अस्तित्ववादी तत्त्वज्ञानांची मांडणी दिसून येते. अस्तित्व हा शब्द मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान असून अस्तित्वाविषयी किंवा जीवनाविषयी काही विचारवंतानी केलेले वैचारिक चिंतन म्हणजे अस्तित्ववाद होय. मानवी अस्तित्व हे अस्तित्ववादात चिंतनाचा प्रमुख विषय असून मी कोण? याचा शोध अस्तित्ववादात घेतला जातो. माणसाला स्वत:ला असण्याची जशी जाणीव असते तशी इतर प्राण्यांना, वस्तूंना ही जाणीव नसते. अर्थात या वैशिष्ट्यांमुळे मानवप्राणी हा इतर प्राण्यापेक्षा वेगळा ठरतो. त्याचे वेगळे स्वतंत्र असे अस्तित्व आहे. प्रथम मानवी अस्तित्व त्यामुळे अस्तित्ववादाचे सूत्र ''मानवी अस्तित्व प्रथम येते व नंतर सारतत्व येते.'' हा या विचाराला गाभा आहे. वसंत आबाजी डहाके यांचे अस्तित्ववाद म्हणजे काय तर ते म्हणतात '' अस्तित्ववाद म्हणजे केवळ साहित्यासंबंधीची विचारधारा नाही तर ते एक जीवनविषयक तत्त्वज्ञान आहे. अर्थात दुसऱ्या महायुद्धानंतर सैरभैर झालेल्या मानवतेचा आविष्कार म्हणजे अस्तित्ववाद होय. '' मानवी जीवनाकडे पाहण्याचा एक गंभीर विचार म्हणजे अस्तित्ववाद होय. तर मे. फ. रेगे अस्तित्ववादाविषयी पुढील प्रमाणे आपले मत व्यक्त करतात, ''मानवी परिस्थिती आणि जीवन यांच्याकडे पाहण्याची एक विकसित दृष्टी आणि तिला अनुरूप अशी जगण्याची एक शैली अस्तित्ववादाशी निगडीत आहे. माणसाच्या परिस्थितीविषयी मानवी अस्तित्वाच्या स्वरूपाविषयी आणि माणसाने कसे जगावे या विषयीचे प्रश्न ते करतात.'' माणसाला स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव होऊन त्यानुसार तो जगण्यास सज्ज होतो.

### अस्तित्ववादी विचाराचे मूळ आशयसूत्र

अस्तित्ववादी विचाराचे मूळ आशयासूत्र पुढील प्रमाणे आहेत. निवडीचे स्वातंत्र्य, परात्मता, असंगतता, चिंता, भय, मृत्यु, अस्सल जीवनसरणी इ.दि. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. त्यामुळे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, वाङ्मयीन व एकूणच सर्वच क्षेत्रे ढवळून निघाली. मराठी साहित्याच्या संदर्भात हा काळ अत्यंत महत्त्वाचा होता. सर्वसामान्य लोकांना शिक्षणाचे महत्त्व कळले. शिक्षणामुळे विचारांची नवी जाणीव निर्माण झाली. पण तत्कालीन परिस्थितीने सर्वांचाच भ्रमनिरास झाला. बेरोजगारी, स्वार्थ बोकाळला. अनेक समस्या निर्माण झाल्या. निराशा, उदासिनता निर्माण झाली. त्यामुळे अर्थातच तरूणांना व सर्वानाच आपली भावना व्यक्त करण्यासाठी अस्तित्ववाद हा जवळचा वाटला. यातून त्यानी आपल्या विचाराला कवितेच्या रूपाने वाट करून दिली.

या कालखंडामध्ये मार्क्सवादी कविता, दलित कविता, जनवादी कविता, आदिवासी कविता, इ. अनेक काव्यप्रवाह, विविध विचारप्रणाली मराठी कवितेत आल्या. त्यामुळे कवितेमध्ये एक नवे युग सुरू झाले. कविता आमुलाग्र बदलली. त्यात महत्त्वपूर्ण भूमिका ही अस्तित्ववादी विचारांची होती. या अस्तित्ववादी विचारांनी प्रेरित झालेली कवींची एक नवी पिढी मराठी काव्यक्षेत्रात समोर आली. त्यामध्ये दिलीप चित्रे, अरूण कोलटकर, विश्वास पाटील, मनोहर ओक, चंद्रकांत खोत, गंगाधर पाटील, गुरूनाथ धुरी, विलास सारंग, वसंत गुर्जर, सतीश काळसेकर, अनिरूद्ध कुलकर्णी, वसंत आबाजी डहाके, सुरेश मथुरे, शरद साटम, प्रभा गणोरकर, तुलसी परब इ. अनेक कवी होते. या कवींच्या कवितेवर अस्तित्ववादी विचारांचा प्रभाव दिसून येतो.

डॉ. अक्षयकुमार काळे म्हणतात, ''फाळणीच्या झेललेला घाव सुकवण्यात आणि हिंदू मुसलमानांच्या दंगलीचे विष पचविण्यात भारतीय समाजमनाची पहिली तीन वर्षे गेली. १९५० पासून भारतीय संविधान अमलात आले. यानंतरचे पहिले दशक राजकीय दृष्ट्या नेहरूचे दशक होते. समाजवादाच्या पायावर नव्या

आधुनिक भारताच्या उभारणीला सुरूवात झाली. मिश्र अर्थव्यवस्था हा या उभारणीचा कणा होता. तथापि त्यात 'सर्वचक्रभ्रमस्कारं' मालक प्रतीगच्छातीचाच प्रत्यय आला. नेहरूंच्या प्रयत्नाने भारताने आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रवेश केला. विश्व शांतिदूत म्हणून नेहरूंकडे बघू लागले. १९५५ च्या दरम्यान भाषावर प्रांतरचनेच्या विचाराला चालना मिळावी त्यातून पुढे महाराष्ट्र गुजरातचा वाद विकोपाला गेला. संयुक्त महाराष्ट्राचा लढा सुरू झाला व पुढे १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. समकालीन साहित्यिकावर या लढ्याचा अस्मिता जागृतीच्या दृष्टीने वरवर का होईना पण प्रभाव पडला.'' या काळामध्ये अनेकांना या विचाराने प्रभावित केले. त्या समकालीन अस्तित्ववादी कविंमध्ये अनेक कवी आहेत. त्या सर्व कवीने कवितेत नवीन वाट शोधली. सर्व समकालीन अस्तित्ववादी कवीनी नवनवे सामर्थ्य मराठी कवितेला प्राप्त करून दिले. समकालीन प्रस्थापित कवींचा विरोध पत्करून अस्तित्ववादी विचारधारा रूजविली. यामध्ये कवींमध्ये दिलीप चित्रे यांचे नाव प्रथम घ्यावे लागेल. त्यांनीच समकालीन मराठी कवितेमध्ये सर्वप्रथम अस्तित्ववादी विचारांची कविता लिहिली.

समकालीन कवीमध्ये अस्तित्ववादी विचारांचे कवी म्हणून त्यांचे काव्यकर्तृत्व उठून दिसते. त्यांच्या कवितेत नवता असल्यामुळे ती अधिक उठून दिसते. नवकवितेच्या पहिल्या पिढीचे नेतृत्व कवी बा.सी. मर्ढेकर यांनी केले. त्यानंतर समकालीन साठोत्तरी कवितेत दिलीप चित्रे यांनी हे कार्य पुढे पार पाडले. १९६० साली त्यांच्या 'कविता' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला. या कवितेपासून मराठी कवितेवर अस्तित्ववादाचा प्रभाव दिसून येतो. त्यानंतर 'कवितेनंतरच्या कविता' व 'एकूण कविता' इ. कवितासंग्रह प्रकाशित झाले. मराठी कवितेला वेगळे वळण देणारे कवी म्हणून त्यांना ओळखले जाते.

''मी उलटा फिरलो तर काय झाल?
मीच शोधत राहिलो मूळं आणि पारंब्या जगभर
मला पाहिजे होतं स्वत:भोवती दाट अरण्य
आणि किड्या मुंग्याशी, पशुपक्ष्यांशी, माणसांशी नाती
एका भुंड्या टेकाडासारख्या समाजात
मी कवी झालो.''

अस्तित्ववादी विचारामध्ये असलेले परात्मतेची भावना दिसून येते. किडामुंगी, पशुपक्षी, जंगल, टेकड्या या सर्वांशी एक नाते कवींनी जोडले आहे व आपले अस्तित्व काय तर भुंड्या टेकडासारखे आहे.

अरूण कोलटकरांच्या कवितेला सामाजिक संदर्भ आहेत. समकालीन कवितेपेक्षा वेगळे काहीतरी प्रकट करण्याची जाणीव त्यांच्या कवितेमागे दिसते. त्यामुळेच ते एका कवितेत म्हणतात,

''पायाळू इमारतीनं मला विचारलं,
आमचा पाय का धरला ?
मी म्हणालो 'आमच्या अंगणात का आला'
म्हणते कशी, तुमचं अंगण केवढं?
अगं टवळे, माहीत आहे मला ते सगळं
किंवा
''पिपंळाची पानं चघळत नाशकापर्यंत आलो
तिथं तुकाराम विकला अन् खिमापाव खाला''.

असे समकालीन मराठी कवितेमध्ये त्यांनी नवनवीन प्रयोग केले. ते प्रयोगशील कवी होते. हरिश्चंद्र थोरात त्यांच्या कवितेबाबत म्हणतात, ''एका बाजूला संपर्क माध्यमांच्या स्टॅटेर्जी माहिती असणाऱ्या उच्चभ्रू रसिकाची अपेक्षा, तर दुसऱ्या बाजूला कवितेवितेशी नाते नसलेल्या माणसाशी संवाद साधण्याची इच्छा असा नियमाशिवायचा दुहेरी खेळ कोलटकरांची कविता खेळते. तिचा संबंध मध्यमवर्गीय वांझपणाशी कोणत्या प्रकारचा आहे हे ही स्पष्ट करणे आवश्यक आहे. पण त्यासाठी अधिक स्पष्ट व फटकळपणे बोलायला हवे...'' अरूण कोलटकरांची कविता अस्सल आहे. प्रत्येक कविता लिहितांना ती वेगळी काहीतरी असली पाहिजे, एक प्रयोगशील सर्जनशीलता त्यांची होती.

समकालीन अस्तित्वादी विचारांचे कवी म्हणून अनिरूद्ध कुलकर्णी यांचेही नाव महत्त्वाचे आहे. त्यांच्या कवितेत परात्मतेची भावना दिसून येते. स्वतंत्र शैली असलेले, वास्तवतेची विसंगती त्यांनी कवितेत रेखाटली 'अर्थाचे निखर्व रिचवून उरणारी गात्रटिबन अवस्था' त्यांच्या कवितेत प्रकट होताना दिसते. गुरूनाथ धुरी यांचे 'ग्लोरिया व समुद्र कविता' या कवितासंग्रहावरून एक अस्तित्ववादी विचारचिंतशीलतेचे दर्शन घडते. जन्म, मृत्यू यांची भीषणता याचा शोध त्यांची कविता घेते. सुरेश मथुरे यांचा 'युकॅलिप्टस' हा कवितासंग्रह महानगरीय जीवन, औद्योगिक संस्कृती, यंत्रयुगाचा मानवी जीवनावर पडलेला परिणाम, एकुण मानवी जीवनावर पडलेला परिणाम एकूण मानवी जीवनाची वास्तवता आपल्या शैलीतून त्यांनी मांडली.

समकालीन अस्तित्ववादी कवितेमध्ये वसंत आबाजी डहाके हे एक श्रेष्ठ अस्तित्ववादी कवी म्हणून ओळखले जातात. त्यांच्या कवितेवर अस्तित्ववादी विचारांचा प्रभाव दिसून येतो. ''प्रचंड किटकगृहासारखा देठ तुटलेल्या शहरात काळोखाच्या राजपुत्रासारखी अवस्था मी भोगतांना दिसतो.'' अशी आपली ओळखच ते करून देतात. त्याच जाणिवेतून त्यांनी काव्यलेखन केले आहे. योगभ्रष्ट (१९७२), शुभवर्तमान (१९८७), शुनशेप (१९९६) व चित्रलिपी (२००६) अशा चारही कवितासंग्रहांवर अस्तित्ववादी विचारांचा प्रभाव दिसून येतो.महानगरीय जीवन, भयाकुलता, मृत्यू, परात्मता, प्रेमकविता, स्वनिर्भत्सना, ईश्वराचा निषेध करणाऱ्या कविता, जागतिकिरण इ. अनेक अस्तित्ववादी विचार कवितेतून प्रगट होताना दिसतात. या विचारांचे त्यांच्या कवितेत एक नवे तेज प्राप्त झाले आहे. एकूणच त्यांचे व्यक्तिमत्त्व या विचारांचे घडले. अस्तित्ववादी विचारांचे एक नवी जाणीव कवीमध्ये निमार्ण केली. या विचारानी मराठी कवितेला नवेपणा आणला. याबाबत रवींद्र घवी म्हणतात, ''अस्तित्ववादी विचारसरणीने जीवनाच्या असंबद्धतेची जाणीव पेरली.'' पुढे ते म्हणतात,''अस्तित्ववाद आली जीवनाच्या असंबद्धतेचे भान याद्वारे एक नवी संवेदनशीलता मराठी कवितेत रूजविण्याचा प्रयोग या कवींनी विशेषत: कोलटकर, चित्रे, डहाके, कुलकर्णी यांनी केला. संकेत मुक्त वातावरण आणि अनेकांगी प्रयोगशीलता हे या काव्याचे वैशिष्ट्ये होय.'' अस्तित्ववादी विचारांच्या कवींने एक नवी वाङ्मयीन संवेदना मराठी कवितेत आणून कवितेला स्वतंत्र विचार दिला.

या सर्व समकालीन अस्तित्ववादी विचारांच्या वेगवेगळ्या छटा दिसून येतात. या विचारांच्या संस्कारातूनच त्यांच्या कविता निर्माण झाल्या. या विचारामुळे सर्व कवीच्या जाणिवा, संवेदना नव्याने घडल्या. जुने वाङ्मयीन संकेत नाकारून नवीन वाट शोधली. या काळात प्रत्येक कवीनी आपला स्वत:च्या स्वतंत्र शैलीने काव्यलेखन केले. एक विशिष्ट दृष्टीकोन असल्यामुळे मानवी जीवनातील अर्थशून्यता, संवेदनशून्यता एकूणच कवितेतून त्यांनी अतिशय भेदकपणे मांडली. सर्वच समकालीन कवीने आपल्या अस्तित्ववादी वैचारिक भूमिका ठामपणे मांडली. त्यामुळे कवीचे एक वेगळे अस्तित्व निर्माण झाले. कवितेला एक नवी दिशा दिली. तिचा पोत बदलला व मराठी कवितेत मूलभूत असा बदल घडून आला.

## निष्कर्ष

१. अस्तित्ववाद मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान आहे.
२. अस्तित्ववादी विचाराला तत्कालीन परिस्थिती कारणीभूत असते.
३. अस्तित्ववाद हा समकालीन कवितेमधील एक महत्त्वाचा विचारप्रवाह आहे.
४. अस्तित्ववादाने मराठी कवितेला नवेपणा आणला.
५. अस्तित्ववादी कवीने कवितेत वेगवेगळे प्रयोग केले.
६. मानवी अस्तित्वाचा विचार कवितेतून मांडला.
७. अस्तित्ववादी कवींनी एका विशिष्ट चौकटीतून मराठी कवितेला बाहेर काढले.
८. अस्तित्ववादाने एक नवा वैचारिक दृष्टीकोण दिला.
९. अस्तित्ववादाने मराठी कविता सर्जनशील झाली.
१०.अस्तित्ववादी कवितेने मराठी कवितेला समृद्ध व संपन्न केले.

## संदर्भ ग्रंथ

१. डॉ. अक्षयकुमार काळे, 'अर्वाचीन मराठी काव्यदर्शन', बनहट्टी प्रकाशन, नागपूर, १९९९
२. वसंत आबाजी डहाके, 'मराठी साहित्य इतिहास आणि संस्कृती', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००६
३. दि.के.बेडेकर, 'अस्तित्ववादाची ओळख', व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७२
४. रेखा इमानदार साने, 'अस्तित्ववाद आणि मराठी कांदबरी', राजहंस प्रकाशन, पुणे, २००४
५. लक्ष्मण शास्त्री जोशी, (संपा.) 'मराठी विश्वकोश', खंड पहिला, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, १९७९